# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १२४ वा बुधवार दि.०४ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## रुग्णांच्या मृत्यू प्रकरणी दोषींवर कारवाई

नांदेड : प्रतिनिधी नांदेड येथील शासकीय वैद्यकीय रूग्णालयात ३० रूग्ण मृत्यूमुखी पडले आहेत. ही घटना अंत्यत दुर्दैवी असून राज्यात हाहाकार उडाला आहे. या घटनेची चौकशी तीन सदस्यीय समिती मार्फत करण्यात येत आहे. समितीचा अहवाल येताच रूग्ण मृत्यू प्रकरणास जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर निश्चितपणे कडक कारवाई होईल, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात २४ तासात २४ रूग्णाचा मृत्यू झाला. यानंतर ४८ तासात हा आकडा वाढत गेला. राज्यात हाहाकार उडवून देणा-या या गंभीर घटनेनंतर आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ व नांदेडचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी मंगळवारी दुपारी शासकीय रूग्णालयास भेट देऊन माहिती घेतली. यानंतर शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत मुश्रीफ बोलत होते. यावेळी खा. प्रतापा पाटील चिखलीकर, आ. राम पाटील रातोळीकर, आ. राजेश पवार, आरोग्य संचालक डॉ. दिलीप म्हेसैकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना हसन मुश्रीफ म्हणाले की, नांदेडच्या शासकीय रूग्णालयात अनेक त्रुटी आहेत,अपुरे मनुष्य बळ आहे. तर रूग्णालयात असलेली घाण आणि अस्वच्छता ही मनाला लाज वाटावी अशीच आहे. शासकीय रूग्णालय ५०० खाटांचे आहे. मात्र १ हजारांपेक्षा जास्त येथे रूग्ण येतात. काही पदे वर्ग १ ते वर्ग ४ ची रिक्त आहेत. यामुळे आरोग्य सेवेतवर ताण वाढत आहे. घडलेल्या या घटनेची जबाबदारी शासन म्हणून आमचीच आहे. यापुढे एकही मृत्यू होणार नाही. यासाठी आम्ही पुर्णपणे दक्षता बाळगत असून झालेल्या ३० मृत्यूंची व्यक्तीगत चौकशी होईल. चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. समितीचा अहवाल येताच जो दोषी असेल, त्याच्यावर कारवाई निश्चिचपणे होईल. तर पुढील काही दिवसात आवश्यक औषधी, मनुष्य बळ उपलब्ध करून दिले जाईल. पुर्णवेळ डीनची नेमणुक केली जाईल, रिक्त पदे भरण्यात येतील असे हसन मुश्रीफ यांनी सांगीतले. तत्पुर्वी शासकीय रूग्णालयात दिलेल्या भेटीत या घटनेची हसन यांनी विस्तृत माहिती घेतली. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खा. प्रताप पाटील चिखलीकर उपस्थित होते.



## केसीआर यांना एनडीएमध्ये यायचे होते; पंतप्रधानांचा मोठा दावा



हैदराबाद : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी छत्तीसगडमध्ये जाहीर सभेला संबोधित केल्यानंतर तेलंगणातील निजामाबाद येथे एका जाहीर सभेला संबोधित केले. तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांचा पक्ष भारत राष्ट्र समिती एनडीएमध्ये सामील होऊ इच्छित असल्याचा मोठा दावा त्यांनी यावेळी केला. सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, हैदराबाद महानगरपालिकेची निवडणूक झाली आणि भाजपने ४८ जागा जिंकल्या, पण कोणालाही बहुमत मिळाले नाही. केसीआर यांना पाठिंब्याची गरज होती, या निवडणुकीनंतर ते मला दिल्लीत भेटायला आले आणि म्हणाले की, आम्हालाही एनडीएचा भाग व्हायचे आहे. आम्हाला एनडीएमध्ये समाविष्ट करा.पंतप्रधान मोदी म्हणाले की, केसीआर यांनी हैदराबाद महानगरपालिकेत भाजपचा पाठिंबा मागितला होता, परंतु मी त्यांना नकार दिला. मी त्यांना म्हणालो की, तुमची कृती अशी आहे, मोदी तुमच्या कामात सामील होऊ शकत नाहीत. आम्ही विरोधी पक्षात बसू शकतो, पण तेलंगणातील जनतेचा विश्वासघात करणार नाही. आम्ही त्यांच्यासोबत युती केली नाही. पंतप्रधान म्हणाले की, केसीआर म्हणाले होते की, ते आता म्हातारे झाले आहेत. जर मुलगा केटीआर तुमच्याकडे आला तर त्याला आशीर्वाद द्या. मी म्हणालो की, ही लोकशाही आहे. तुम्ही तुमच्या मुलाला गादी कशी देऊ शकता.गुजराती विकासासाठी आला आहे तसेच पंतप्रधान म्हणाले की, मुख्यमंत्री केसीआर पूर्वी माझे स्वागत करण्यासाठी विमानतळावर येत असत, परंतु हे सर्व अचानक थांबले. तेलंगणाला गुजराती पुत्र सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्य दिले होते. आता दुसरा गुजराती विकासासाठी आला आहे.

## शिवाजी पार्क मिळणार कोणाला? पालिका दोन-तीन दिवसांत घेणार निर्णय

मुंबई - शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्यावरून यंदाही शिवसेना ठाकरे व शिंदे गट एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. दोन्ही गटांकडून यासाठी अर्ज पालिकेकडे महिनाभरापूर्वीच अर्ज करण्यात आले आहेत. गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही दोन्ही गटात संघर्ष पेटण्याची शक्यता आहे.

शिवाय कोणताही गट न्यायालयात गेल्यास पुढील कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी मुंबई महापालिकेकडून कायदेशीर बाबी तपासल्या जात आहेत. त्यामुळे कायदेशीर सल्ला घेऊन येत्या दोन - तीन दिवसांत यावर निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते. त्यामुळे शिवाजी पार्क कोणाला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दसरा मेळाव्यावरून गेल्या वर्षी शिवसेना ठाकरे आणि शिंदे गटात संघर्ष पेटला होता. शिवाजी पार्कसाठी दोन्ही गटांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. आता यंदाही दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मिळावे यासाठी दोन्ही गट आमने - सामने आले आहेत. दसरा मेळावा शिवाजी पार्कातच होणार असा निर्धार ठाकरे गटाने केला आहे, तर शिंदे गटाने यंदा दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क आम्हालाच मिळणार असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

पालिकेच्या दादर जी - उत्तर विभाग कार्यालयात या दोन्ही गटाने यासाठी अर्ज केला आहे. यंदा शिवसेनेकडून आमदार सदा सरवणकर आणि ठाकरे गटाकडून विभाग प्रमुख महेश सावंत यांनी शिवाजी पार्क मिळण्यााठी पालिकेच्या दादर येथील जी उत्तर विभाग कार्यालयात अर्ज दाखल केले आहेत. शिवसेना पक्ष आणि चिन्ह आम्हाला मिळाले आहे.

## तेजस्वीन शंकरने डेकॅथलॉनमध्ये रौप्य पदक जिंकले; आतापर्यंत ६७ पदकांची कमाई

बीजिंग : भारतीय धावपटू तेजस्वीन शंकरने हँगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेतील डेकॅथलॉन स्पर्धेत रौप्य पदक पटकावले आहे. भारताच्या तेजस्वीन शंकरने पुरुषांच्या डेकॅथलॉन स्पर्धेत रौप्य पदक जिंकून इतिहास रचला आहे. भारताने आतापर्यंत ६७ पदकांची कमाई केली आहे. भारताने एकूण १४ सुवर्ण, २७ रौप्य, २६ कांस्य पदके जिंकली आहेत.आशिया क्रीडा स्पर्धेच्या १० व्या दिवशी (आज) मंगळवारी भारताच्या धावपटूंनी मैदान गाजवले. भारताच्या तेजस्वीन शंकरने डेकॅथलॉनमध्ये रौप्य पदक जिंकले. या स्पर्धेत १० विविध खेळ खेळले जातात. ही स्पर्धा दोन दिवस चालणार आहे. १९७४ पासून भारताला या स्पर्धेत एकही पदक मिळालेले नाही. १९७४ मध्ये विजयसिंह चौहानने सुवर्ण आणि सुरेश बाबूने कांस्यपदक जिंकले होते.८०० मीटर शर्यतीत रौप्यपदक पुरुषांच्या ८०० मीटर शर्यतीत भारताच्या मोहम्मद अफसलने रौप्यपदक पटकावले. त्याने १ मिनिट ४८.४३ सेकंदांची वेळ घेत शर्यत यशस्वीरित्य पूर्ण केली. शेवटच्या काही मीटरमध्ये सौदी अरेबियाच्या एसा अलीने त्याच्यावर आघाडी घेतली आणि त्याचे सुवर्णपदक हुकले.ट्रीपल जंप'मध्ये कांस्यपदक प्रवीण चित्रवेलने पुरुषांच्या ट्रीपल जंपमध्ये तिहेरी उडी स्पर्धेत कांस्यपदक पटकावले आहे. त्याने सहाव्या प्रयत्नात १६.६८ मीटर उडी मारली आणि तिसरे स्थान पटकावले. भारताचा अबू बकर १६.६२ मीटरच्या उडीसह चौथ्या स्थानावर राहिला.

## शेतकऱ्यांनी पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा आमदार धिरज देशमुख यांचे आवाहन; धरणात केवळ ३० टक्के पाणीसाठा

मांजरा धरण हे १९८८ मध्ये पहिल्यांदा शंभर टक्के भरले होते. तेव्हापासून आजवर हे धरण १६ वेळेस पूर्ण क्षमतेने भरले आहे. सलग ३ वर्षे धरण १०० टक्के भरले होते. ही अत्यंत समाधानाची बाब होती. यंदाही हे धरण भरावे, अशीच माझी प्रार्थना आहे.



लातूर : गेल्या काही दिवसांत झालेल्या परतीच्या पावसामुळे मांजरा नदीवरील काही बराज तुडूंब भरले आहेत. पुढचे काही दिवस पाऊस असाच राहिला तर उर्वरित बराजही भरतील, अशी आशा आहे. पण, या पाण्याचा सर्वांनी अत्यंत काळजीपूर्वक व काटकसरीने वापर करावा, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मंगळवारी येथे केले. पावसाळ्याच्या गेल्या चार महिन्याच्या कालावधीत आपल्याकडे पुरेसा पाऊस झाला नाही. लातूरकरांची जीवनवाहिनी असलेल्या मांजरा धरण क्षेत्रातही पावसाने यंदा पाठ फिरवली आहे. त्यामुळे धरणात सध्या पुरेसा पाणी साठा नाही. परतीच्या पावसामुळे या आठवडाभरात धरणातील साठा ३० टक्क्यांपर्यंत पोचला आहे. पण, धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरेल, ही आशा धूसर बनली आहे. परतीचापाऊससध्याअंतिमटप्प्यातपोचलाआहे.हवामान विभागाच्या सध्याच्या अंदाजानुसार आता मुसळधार पावसाची शक्यता कमी आहे. पण, मांजरा नदीवरील उर्वरित बराज भरतील, असे संकेत मिळत आहेत. या पाण्याचा सर्वांना अतिशय काटकसरीने, नियोजनबद्ध वापर करावा लागणार आहे, याकडे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी लक्ष वेधले.

श्री. धिरज देशमुख,
आमदार, लातूर ग्रामीण

## उपराष्ट्रपती रॅकेल पेना यांची नवीन संसद भवनाला भेट

नवी दिल्ली : भारत दौऱ्यावर आलेल्या डोमिनिकन रिपब्लिकच्या उपराष्ट्रपती रॅकेल पेना यांनी मंगळवारी संसदेच्या नवीन इमारतीला भेट दिली. संसदेच्या नवीन इमारतीला भेट देणाऱ्या त्या पहिल्या परदेशी पाहुण्या आहेत. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी रॅकेल पेना यांचे नवीन संसदेत स्वागत केले. तसेच भारत आणि डोमिनिकन रिपब्लिक यांच्यातील संबंधांना २५ ऐतिहासिक वर्षे पूर्ण होत आहेत.

ओम बिर्ला यांनी रॅकेल पेना यांना संसदेच्या नवीन इमारतीबाबत माहिती दिली. यावेळी



ओम बिर्ला म्हणाले की, लोकशाहीचे हे मंदिर भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. भारताची सांस्कृतिक विविधता नव्या संसद भवनात दिसून येते. तसेच त्यांनी संसदेच्या नवीन इमारतीत नुकत्याच पार पडलेल्या १३व्या अधिवेशनाची माहितीही रॅकेल पेना यांना दिली. त्यांनी संसदेत संमत झालेल्या नारी शक्ती वंदन कायद्याची माहिती सांगितली.यावेळी ओम बिर्ला यांनी जी-२० देशांच्या संसदेच्या पी-२० शिखर परिषदेवरही चर्चा केली. त्यांनी सांगितले की पी-२० परिषद १३ आणि १४ ऑक्टोबर रोजी दिल्लीत होणार आहे. ओम बिर्ला यांनी रॅकेल पेना यांच्याशी दोन्ही देशांमधील आर्थिक आणि व्यापारी संबंधांवरही चर्चा केली.

## श्रीरेणुका देवी भक्तनिवास बांधकामाची आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून पाहणी

लातूर :- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील श्री रेणुका देवी मंदिर परिसरात भाविक भक्तांच्या सोयीसाठी बांधण्यात येत असलेल्या एक कोटी रुपये खर्चाच्या भक्तनिवास बांधकामाची भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी रविवारी पाहणी करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

आदिशक्ती श्री रेणुका देवीच्या दर्शनासाठी जिल्ह्यातील अथवा मराठवाड्यातीलच नव्हे तर राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने येतात. भाविकांची राहण्याची सोय व्हावी याकरिता रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी भक्तनिवास बांधकाम व्हावे यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे आग्रह केला होता. त्यानुसार आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांच्याकडे नगर विकास विभागाअंतर्गत निधी मिळावा यासाठी सतत पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे श्रीरेणुका देवी मंदिर परिसरात भक्तनिवास बांधकामाकरिता एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला. सदरील निधीतून नियोजित भक्तनिवास बांधकाम करण्यात येत आहे या बांधकामाची आ. रमेशआप्पा कराड यांनी रविवारी दुपारी पाहणी करून समाधान व्यक्त केले त्याचबरोबर अनेक महत्वपूर्ण सूचना केल्या.

प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी आदिशक्ती श्री रेणुका मातेचे आरती करून भक्तीभावे दर्शन घेतले. भक्तनिवास बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंदिर ट्रस्टच्या वतीने आ. कराड यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ अनिता अलगुले, पसचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महिंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, माजी नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, अनिल भिसे, सतीश आंबेकर, दत्ता सरवदे, श्रीकृष्ण जाधव, विजय गंभीरे, सचिन चेवले, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण पवार, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राम पाटील, उटगे



गुरुजी, अँड प्रशांत आकनगिरे, दिलीप आकनगिरे त्याचबरोबर सचिन सिरसकर, अमर चव्हाण, शिवमुर्ती उरगुडे, शिला आचार्य, माधव गुडे, उत्तम चव्हाण, संतोष चव्हाण, उज्वल कांबळे, अच्युत कातळे, राजू आलापुरे, अंतराम चव्हाण, शेख अजीम, रमा चव्हाण, राजू आत्तार, लखन आवळे, हनुमंत भालेराव, दिलीप चव्हाण, संतोष राठोड, गणेश माळेगावकर पप्पू कुडके यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माझ लातूर च्या साखळी उपोषणास शिवसेना ठाकरे पक्षाचा पाठिंबा

लातूर :लातूर येथे मंजूर असलेले जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न त्वरित सोडविण्यात यावा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खाजगी करण रद्द करण्यात यावे सोयाबीन संशोधन केंद्र लातूरलाच स्थापन करण्यात यावे देवणी गो संवर्धन केंद्र देवणी येथे व्हावे या मागणी माझ लातूर च्या साखळी उपोषणास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा जाहीर पाठिंबा दिला आहे यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी यांनी शिवसेनेने सोयाबीन संशोधन केंद्र लातूर येथे करावे या मागणीसाठी लातूर जिल्हातील सर्व बाजार समिती बंद करून निषेध नोंदविला होता तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचा लातूर जिल्हात कार्यक्रम होऊ देणार नाही असा इशारा दिला होता हिच मागणी माझ लातूर परिवार करत आहे त्यांना पुर्ण पाठिंबा आहे असे मत व्यक्त केले व शासनाचा जाहीर निषेध केला या मागणीसाठी आंदोलन करावे लागत आहे ही शरमेची बाब आहे व सत्ताधारी आमदाराच्या कामावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे अस मत शिवसेना सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी व्यक्त केले यावेळी माजी जिल्हाप्रमुख नामदेव मामा चाळक, त्र्यंबक स्वामी, माजी उपसभापती किशोर जाधव, अंनत जगताप, सुरेश मुसळे, सोमनाथ स्वामी आदी सह इतर पदाधिकारी उपस्थित होते



## संपादकीय....

# 'नारी शक्ती वंदन' हे पुढले पाऊल!

जनगणना व मतदारसंघ फेररचनेनंतरच काही मतदारसंघ नव्याने आरक्षित करण्याचे बंधन घटनेनेच घातलेले आहे.अर्जुन राम मेघवाल, केंद्रीय विधि व न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) आणि संसदीय कामकाज राज्यमंत्रीजनगणना व मतदारसंघ फेररचनेनंतरच काही मतदारसंघ नव्याने आरक्षित करण्याचे बंधन घटनेनेच घातलेले आहे. ते पाळूनच मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे.. भारताने जगाचे नेतृत्व करावेच पण भारताचे नेतृत्व महिलांकडे असावे, या इच्छेमुळे महिलांना आरक्षण दिले आहे..

लोकशाही व्यवस्थेमध्ये कोणत्याही उल्लेखनीय बदलासाठी सहमतीने घेतलेल्या निर्णयाला विशेष महत्त्व असते. यातून परिवर्तनाच्या प्रवासाची सामूहिक भावना दिसून येते. अलीकडेच भारताने जगावर प्रभाव पाडू शकणारे ऐतिहासिक निर्णय पाहिले आहेत - पहिला म्हणजे 'जी-२०' अध्यक्षपदाचा एक भाग म्हणून दिल्ली जाहीरनाम्यावर एकमत निर्माण करणे, तर दुसरा म्हणजे 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (आता राष्ट्रपतींचीही मोहोर उमटल्यामुळे कायदा) संमत होणे. जागतिक भू-राजकारण बहुआयामी अशांततेने ग्रासलेले असताना, 'लोकशाहीच्या जननी'च्या मुकुटातील हे दागिने शोभावेत असे निर्णय आहेत. संसदेच्या नवीन इमारतीच्या पहिल्याच विधिविषयक कामकाजाने, राष्ट्राच्या प्रगतीसाठी महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचा मार्ग निश्चित केला आहे. या संकल्पाचे परिवर्तन सिद्धीमध्ये करण्याची हिंमत केवळ मोदी सरकारने दाखवली, हे नमूद करण्याजोगे आहे. प्रातिनिधिक लोकशाहीत महिलांना त्यांचा योग्य वाटा मिळवून देण्याचा हा २७ वर्षांचा प्रवास आहे. साध्या शब्दांत सांगायचे तर नारी शक्तीचा विद्यमान किमान हिस्सा आपल्या लोकसंख्येच्या जवळपास निम्मा असूनसुद्धा त्यांना लोकप्रतिनिधित्वात स्थान न मिळणे ही कमतरता होती. याच काळात सामाजिक गतिमानतेने महिलांना 'केवळ दुसऱ्यांचे ऐकणारी नव्हे, तर निर्णय घेणारी व्यक्ती' असे स्थान मिळालेले आहे. महिलांनी पारंपरिक कल्पनांच्या बंधनांशी यशस्वी सामना करून, प्रत्येक क्षेत्रात देशाचा गौरव वाढवला आहे. तरीही राजकीय क्षेत्रात महिलांना कमी स्थान होते. आता नरेंद्र मोदी सरकारने नैतिक निवडीला प्राधान्य दिले आहे आणि एक ऐतिहासिक उणीव सुधारण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती दाखवली आहे. 'नारी शक्ती वंदन अधिनियम'मुळे संसदेसह राज्यांच्याही विधिमंडळांमध्ये - म्हणजे कायदे घडवण्याच्या क्षेत्रामध्ये - प्रस्तावित केलेली लिंगभाव-समानता यापुढे संतुलित धोरण निर्मितीला चालना देईल.स्वातंत्र्यानंतर महिलांना समान मतदानाचा हक्क देण्यासाठी अमेरिकेला १४४ वर्षे लागली हे दुर्दैवीच म्हणावे लागेल. ब्रिटनमध्ये तर महिलांच्या मताधिकाराची चळवळ सुमारे १०० वर्षे चालवावी लागली- आधी मन वळवणे, मग निषेध असे मार्ग त्या चळवळीने पत्करले आणि अखेर पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश महिलांना मतदान-हक्क मिळाला.आपले पूर्वज दूरदर्शी होते आणि त्यांनी राज्यघटनेतच महिलांसह सर्व भारतीयांना मतदानाचा हक्क मिळवून दिला. आता, स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षांनंतर, 'अमृत काला'चा जणू आणखी एक शुभशकुन म्हणून भारताने त्या मतदानाच्या अधिकारातून पुढली झेप घेतली आहे, त्यामुळे संसद आणि विधिमंडळांत महिलांसाठी प्रतिनिधित्वाच्या अधिकाराचा वाटा वाढणारच आहे.घटना-समितीपुढील २५ नोव्हेंबर १९४९ च्या ऐतिहासिक भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्टपणे विचारले होते की, कोण किती काळ विरोधाभासाचे जीवन जगत राहील. सामाजिक आणि आर्थिक असमानतेबद्दल सावधगिरीचा इशारा डॉ. आंबेडकर यांनी त्या भाषणात दिला होता. ते विरोधाभास नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या गेल्या नऊ वर्षांत, गरीब समर्थक आणि लोककेंद्रित हालचालींनी दूर केले आहेत! आजमितीला साडेतेरा कोटींहून अधिक लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, ही वस्तुस्थिती याचीच साक्ष आहे. ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हे 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' या भावनेची जाणीव करून देणारे आणखी एक पाऊल आहे.स्त्रीवर्गाच्या क्षमतेचा वापर राजकारणबाह्य दृष्टिकोनातूनही याकडे पाहाता येते. भारतीय तात्त्विक मूल्ये सांगतात की स्त्रण आणि पौरुषयुक्त गुणांचे परिपूर्ण संतुलन आंतरिक शांती, सुसंवाद आणि वैयक्तिक पूर्तता आणून आत्म-वास्तविकतेची स्थिती निर्माण करते. मानवतेच्या सामूहिक पूर्ततेसाठी आणि कल्याणासाठी स्त्रीवर्गाच्या नैसर्गिक क्षमतेचा वापर करणे आपल्यावर अवलंबून आहे. चिकाटी, सर्जनशीलता, त्याग, समर्पण, लवचीकता आणि विश्वास हे महिलांचे जन्मजात गुण असतात आणि कुठल्याही मॅनेजमेंट डिग्रीविना, कुठल्याही आयआयएममध्ये न जातासुद्धा हे गुण महिलांना नेतृत्वाच्या भूमिकेसाठी सर्वोत्तम बनवतात. फक्त त्यांना त्यांची योग्य जागा देऊ केल्याने प्रचंड क्षमता निर्माण होईल आणि इतरांसाठी ते शासनव्यवस्थेचे एक अनुकरणीय, परिपूर्ण प्रारूप असेल.नारी शक्ती वंदन अधिनियमासाठी आणलेला संविधान (एकशे अठ्ठाविसावी दुरुस्ती) कायदा हा मोदी सरकारसाठी राजकीय पाऊल नाही, तर ते विश्वासाचा उद्गार आहे. भारतीय जनता पक्षाने जुलै २००३ मध्येच रायपूर येथील राष्ट्रीय कार्यकारिणी समितीच्या बैठकीत संसद आणि राज्य विधानसभेत महिला आरक्षणाचा ठराव मंजूर केला होता. नंतर पक्षाने संघटना स्तरावर याची अंमलबजावणी केली आणि आपल्या जाहीरनाम्यात त्याचा समावेश केला. आता ते संपूर्ण राष्ट्रासाठी परिवर्तनाचे साधन बनले आहे. संसदेचे 'विशेष अधिवेशन' बोलावणे आणि सर्व राजकीय पक्षांना सहमती-आधारित निर्णयासाठी सहभागी करून घेणे हे अत्यंत कठीण काम होते, तेही सरकारने काळजीपूर्वक केले आहे. ज्यांनी या उदात्त हेतूला यापूर्वी विरोध केला होता अशा पक्षांनीसुद्धा आता या विधेयकाला होकार देणे ही त्यांची निवड नसेल, तर त्यांच्या राजकीय मजबुरीतून तरी झालेले आहे. जुन्या संसदेची इमारत ब्रिटिशांकडून झालेल्या सत्तांतराची, पुढे त्यासाठी राज्यघटना बनवण्याची साक्षीदार होती, पण लोकशाहीच्या या नव्या मंदिराने आपल्या राज्यघटनेच्या छत्राखाली त्या सत्तेचे आणखी प्रगतिशील असे वाटप केले आहे.नुकत्याच भारताच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या 'जी-२०' शिखर बैठकीने हे सिद्ध केले आहे की, जागतिक आव्हाने सौहार्दपूर्णपणे सोडवण्यासाठी भारत खूप महत्त्वाचा आहे. भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे आणि समांतरपणे राष्ट्रीय संसदेत महिलांच्या टक्केवारीची जागतिक सरासरी (२६.७ टक्के) ओलांडण्यासाठी सज्ज होतो आहे.

# मूर्ती छोटी किर्ती मोठी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता.

मी १९८२ पासून असंघटीत नाका कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या सत्यशोधक कामगार संघटनेचे काम करत आलो आहे.त्या असंघटीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मुंबईसह राज्यातील सर्व संघटनांना अनेकदा एकत्र करून कृतिसमिती,सुरक्षा परिषद बनवल्या,इंटक,आयटक,सिटूच्या राष्ट्रीय नेत्या बरोबर अंतर राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मला मिळाली होती.त्यामुळे त्यांची आणि आंबेडकरी चळवळीतील नेत्याची काम करण्याची पद्धत जवळून पहिल्या गेली.पण समस्या काय आहे.ते सोडविण्यासाठी काय केले पाहिजे.याचे कोणताही अभ्यासपूर्ण नियोजन न करता मोर्चा, आंदोलन करून आंबेडकरी विचारांचा जय जय कार करून स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी तडजोडी करणारे सामाजिक,धार्मिक आणि राजकीय नेते पायलीचे पंधरा पाहायला अनुभवाला मिळाले.पण क्रांतिकारी विचारांची अंमलबजावणी करणारे शोधावे लागतील,संविधानाच्या चौकटीत राहून पंचशिलेचे पालन करणारे व कामगार कर्मचारी व अधिकारी वर्गाला संघटनेच्या माध्यमातून शिस्तबद्ध पद्धतीने काम करण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ते पदाधिकारी बनविणारे एकमेव मूर्ती छोटी किर्ती मोठी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता म्हणजेच आदरणीय जे एस पाटील राष्ट्रीय अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन (आय.एल.यु) व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे मुख्य सल्लागार,मागासवर्गीय अधिकारी आणि कर्मचारी यांचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी अहोरात्र संघर्ष करणारे नेते म्हणून राज्यातच नव्हे तर देशातील २५ राज्यात आणि ३२ कामगार क्षेत्रात क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता अशी त्यांची लक्षवेधी ओळख निर्माण झाली आहे. सुरक्षित नोकरी करणारे आरक्षण लाभार्थीच नव्हे तर समाजातील सर्व क्षेत्रातील तळागळातील संघटीत असंघटीत कामगारांचे आशास्थान सन्मानीय जे.एस.पाटील साहेब आहेत. उत्तर भारतात बहुजन समाजात मान्यवर कांशीराम यांनी प्रबोधन करून प्रचंड राजकिय जागृती निर्माण केली होती.त्यामुळेच मागासवर्गीयांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय महत्वकांक्षा निर्माण झाल्या होत्या.आपल्या राजकीय मूल्यांबाबत उघडपणे भरभरून बोलणारा बहुजन समाज मुख्यतः कर्मचारी-कामगार वर्ग हा फुले-आंबेडकरवादी कामगार चळवळीच्या माध्यमातून संघटित होण्याबाबत मात्र अगदीच उदासीन असल्याचे उत्तर व दक्षिण भारतात दिसून येते.

बहुसंख्या बहुजन समाजातील कामगार,कर्मचारी आणि अधिकारी वर्ग हा मोठ्या प्रमाणात गोळवल करवादी,गांधीवादी,साम्यवादी कम्युनिस्ट विचारांच्या ट्रेंड युनियन मध्ये किर्याशील सभासद असल्याचे दिसून येते. त्यांची नांवे वेगवेगळी असली तरी त्यांचे अंतिम ध्येय हिंदुराष्ट निर्माण करून जाती व्यवस्था जशी होती तशीच ठेवणे हे आहे.त्यांना समान काम,समान वेतन,समान न्याय,समान अधिकार हे मान्य नाही हे त्यांनी दाखवून दिले आहे.त्यामुळेच प्रत्येक कामाच्या ठिकाणी असलेली ब्राम्हणवाद्यांची मक्तेदारी,त्यांच्या प्रस्थापित संघटना व मागास-बहुजन कामगारांवर पिढ्यानपिढ्या लादलेली सामाजिक विषमतेची व्यवस्था ही बहुजन समाजामध्ये फुले-आंबेडकरवादी कामगार चळवळीत संघटित होण्याविषयी भीती निर्माण करते.ही भीतीच सर्वप्रथम दूर करण्याचे लक्षवेधी प्रबोधन आदरणीय जे.एस.पाटील यांनी केले आहे.त्यामुळेच उत्तर भारतात व दक्षिण भारतात स्वतंत्र मजदूर युनियनची पाळेमुळे घट्ट होतांना दिसत आहेत.

भारतातील ब्राम्हणवाद दरवर्षी शोषण करण्याची माध्यमे बदलत असतो.व्यवस्थेचे परिवर्तन मान्य नसल्याने शोषितांसाठी वरवरचे बदल तो स्वतः घडवून आणतो.बहुजन कामगारांनी आपले हक्क प्राप्त करून घेण्यासाठी स्वतंत्र 'ट्रेड युनियन' स्थापन न करता ब्राम्हणवाद्यांचेच नेतृत्व स्वीकारावे म्हणूनच वेल्फेअर असोसिएशन,फेडरेशनचा फार्स ब्राम्हणवाद्यांनी निर्माण केले आहेत. हे सर्वप्रथम स्पष्टपणे मांडण्याचे काम माननीय जे.एस.पाटील यांनी केले आहे,त्यामुळेच ते देशातील मूर्ती छोटी किर्ती मोठी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता म्हणून एकमेव नेतृत्व पुढे येत आहे.

फुले-शाहू,आंबेडकरवादी विचारांची देशव्यापी ट्रेड युनियन निर्माण होईल व ती राष्ट्रीय पातळीवरील ट्रेंड युनियन महासंघानां आव्हान निर्माण करील असे कोणालाही वाटले नव्हते, मान्यताप्राप्त प्रस्थापित ट्रेंड युनियनच्या विरोधात म्हणजेच ब्राम्हणवादाला थेट आव्हान आज क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता देत आहे.त्याला सर्व मागासवर्गीय ओबीसी आदिवासी अल्पसंख्याक यांनी मोठ्या प्रमाणात साथ मिळत आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून सुरु झालेला हा संघर्ष आज स्वतंत्र मजदूर युनियनच्या माध्यमातून एक देशव्यापी राष्ट्रीय कामगार चळवळ बनली आहे.

मूर्ती छोटी किर्ती मोठी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता जे एस पाटील यांच्या कुशल संघटक,निर्भीड वकृत्व आणि निडर नेतृत्वाने,मिशनरी बाण्याने,मोठ्या जिद्दीने राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र मजदूर युनियनचे जाळे विणल्या जात आहे.वैचारिक पातळीवर उभी राहत आहे. देशभरातील मागासवर्गीय,ओबीसी आदिवासी अल्पसंख्याक समाजातील कामगार कर्मचारी जागरूक होऊन स्वतःच्या ट्रेंड युनियन स्थापन करून आय एल यु शी संलग्न करीत आहेत. एखादया क्षेत्रात करिअर करायचंय म्हणून काम करणारे अनेक इंजिनियर लोक भेटतील पण आंबेडकरी विचारांची क्रांतिकारी राष्ट्रीय पातळीवर ट्रेंड युनियन उभी करण्यासाठी जीवाचे रान करणारा इंजिनियर एखादाच भेटेल. प्रशासनाच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात कामगार,कर्मचाऱ्यांना संघटित करून संघर्ष करण्यास तयार करणारा अधिकारी कुठेही भेटणार नाही.कामगारांना संघटित करून युनियन बनविली म्हणून बदली झाली,तर सुवर्ण संधी म्हणून नवीन ठिकाणी नव्या जोमाने काम करणारा इंजिनियर अधिकारी अशी ओळख निर्माण करणारा माणूस सेवा निवृत्तीनंतर घरी बसून नातवांना खेळवत बसला असतात.पण सेवा देत असतांना कामगार कर्मचाऱ्यांचे संघटना बांधणी करून प्रशिक्षित कार्यकर्ता पदाधिकारी निर्माण करणारा माझ्या दृष्टीने एकमेव नेता मूर्ती छोटी किर्ती मोठी म्हणजेच जे एस पाटील साहेब असावेत. मी अनेक राजकीय सामाजिक कामगार नेते पाहिले,जे स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघटना पक्ष बांधणी करतात,तेव्हा ते तोंडात साखर डोक्यावर बर्फ व पायाला भिंगरी लावून फिरतात.तेव्हा कुठे त्यांचे थोडे फार नांव राहते.इथे पाटील साहेबांचे उलटे आहे,पायाला जरूर भिंगरी आहे,पण तोंडात साखर नाही,रोखठोक शब्दांत शिस्तबद्ध पध्दतीने काम करण्याची तंबी आहे,डोक्यावर बर्फ नाही तर सकारात्मक विचारांची प्रचंड ऊर्जा आहे.भावनिकता बिलकुल नाही,आंबेडकरी विचारांची क्रांतिकारी भाषे सोबत सनदशीर मार्गाने आचरणाचे हमी हवी आहे. भारतीय संविधानात दिलेल्या प्रशासकीय कामाचा दर्जा वेळोवेळी दिली जाणारी जबाबदारी तिचा तिमाही,सहामाही,वार्षिक सर्वसाधारण सभेत मजूर केलेला अहवाल सादर करण्यात कोणतीही




सबब चालत नाही,प्रशिक्षण शिबिरात वेळेवर न येणाऱ्याला प्रवेश नाही.म्हणजेच नाही,असे कडक शिस्तीचे क्रांतिकारीआंबेडकरी विचारांचे क्रांतिकारी नेते सर्वच क्षेत्रात निर्माण झाले असते तर आंबेडकरी समाज हा शासन कर्ती जमात शंभर टक्के झाला असता. बाबासाहेबांनी सांगितले होते,शासन कर्ती जमात बना आणि शासन यंत्रणेवर कायमस्वरूपी दबाव निर्माण करा. प्रशासकीय कामाचा अनुभव असणारे आय ए एस, खपवळरप -वाळपळीीीरींळींश इर्शीीळलश,अधिकारी खूप झाले पण त्यांनी स्वताच्या व्यक्तीगत संघटना,महासंघ निर्माण केले.पण त्यानी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या ट्रेड युनियन ला महत्व दिले नाही.म्हणून ते सेवानिवृत्त झाल्यानंतर आज समाजात,चळवळीत कुठे ही दिसत नाही.कामगार नेता सोडा माजी अधिकारी म्हणून असलेली ओळख सुद्धा पुसली जात आहे.

हजारो लोकांना गोळा करून संघटना स्थापन करून चालविण्या ऐवजी शंभर लोक रीतसर सभासद बनवून केलेलं काम निश्चितच ध्येय गाठण्यासाठी परिपूर्ण असते.त्यासाठी क्रांतिकारी विचारांची देवाणघेवाण नियमितपणे झाली पाहिजे.समस्या निर्माण होणार नाहीत यासाठी आदरणीय जे एस पाटील यांच्या नेतृत्वाखाली देश पातळीवर स्वतंत्र मजदूर युनियन काम करते. त्यात देशभरातील संघटित असंघटित कामगार संघटना संलग्न होत आहेत,राष्ट्रीय पातळीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगार,कर्मचाऱ्यांनी संघटित व्हावे क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा कामगार नेत्याचे हात मजबूत करावे,आदरणीय जे एस पाटील यांच्या (६ ऑक्टोबर १९५५) ६८ वर्ष पूर्ण करून ६९ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.पण तरुणांना लाजवेल अशी धडाडी आज ही त्यांच्यात आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली २०१७ पासून मी काम करीत आहे.त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हा लेख लिहला आहे.

लाखो कामगार कर्मचारी अधिकारी वर्गाला प्रेरणा देणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजेच जे एस.पाटील साहेब आहेत. त्यांची साधी राहणी,उच्च विचार आणि शुद्ध आचरण हे कौतुकास्पद आहे. कोणत्याही पोस्टरवर,होडिंग वर फोटो टाकून प्रसिद्धसाठी प्रचार करण्यास सक्त मनाई करणारे नेते शोधून सापडणार नाहीत,अशा कडक शिस्तीच्या प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केलेल्या शिस्तबद्ध पद्धतीने ट्रेंड युनियनचे राष्ट्रीय नेतृत्व करणाऱ्या क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा कामगार नेता मूर्ती छोटी किर्ती मोठी अशी प्रतिमा आदरणीय जे एस पाटील साहेब यांनी निर्माण करून ठेवली आहे.

आंबेडकरी चळवळीच्या एकाही नेत्यांनी ६० वर्षात असे लक्षवेधी काम केले नाही.त्यांनी व्यक्तिगत पातळीवर आर्थिकदृष्ट्या खूप प्रगती केली असेल.पण संघटनेची संस्थेची साधन संपतीचे काय?.स्वताचे मालकी हक्काचे एक कार्यालय किंवा सभागृह नाही.मात्र जे.एस पाटील यांच्या कुशल त्यागी जिद्दी नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे बांद्रा मुंबईत म्हाडा कार्यालयासमोर सुप्रभात बिल्डींग मध्ये करोडो रुपयाचे कार्यालय आहे. नागपूर मध्ये मध्यवर्ती ठिकाणी निलकमल कॉम्प्लेक्स महाजन मार्केट सीताबर्डी येथे मध्यवर्ती कार्यालय व १०० लोक बसतील एवढे सभागृह आहे.प्रेरणा नगर, हजारी पहाड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र तीन मजली इमारत आहे.त्यात एक हजार लोकांचे सभागृह, पाचशे,तीनशे लोकांचे वातानुकूलित सभागृह आणि दोन व्ही आय पी सूट, सहा,आठ लोकांसाठी स्पेशल खाटची व्यवस्था,पाहुण्यांसाठी दोन खाटांचे आठ रूमची व्यवस्था आहे.कामगार कर्मचारी अधिकारी नागपुरात कामा निमित्याने आला तर हॉटेल लॉज वर राहण्याची गरज नाही. असेच प्रशिक्षण केंद्र तीन माजली इमारत औरंगाबाद तयार झाले आहे.लवकरच त्याचे उद्घाटन सोहळा होणार आहे.एका महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या बळावर हे निर्माण झाले आहे.स्वतंत्र मजदूर युनियन संलग्न युनियनचा काही प्रमाणात त्यात सहभाग आहे. सर्व क्षेत्रातील कामगार कर्मचारी अधिकारी वर्गाने अशा पद्धतीने काम केल्यास प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात स्वताच्या मालकीचे कार्यालय व सभागृह उभे राहू शकते.हे केवळ आणि केवळ जे.एस.पाटील,रमेश रंगारी सारखी इंजिनियर प्रशासकीय अधिकारी संघटीत झाल्यामुळे शक्य झाले.त्यात अनेकांचे मोलाचे योगदान आहे.आज वयाची ६८ वर्ष पूर्ण झाल्यावर ही जे एस पाटील साहेब घरात न बसता मागासवर्गीय कामगार कर्मचारी अधिकारी आणि विशेष असंघटीत कामगारांना संघटीत करण्यासाठी शारीरिकदृष्ट्या कोणते ही कारण न सांगता राज्यात आणि देशात स्वतंत्र मजदूर युनियन मजबूत करण्यासाठी फिरतात. म्हणूनच मी मूर्ती छोटी किर्ती मोठी क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचा राष्ट्रीय कामगार नेता असे लिहतो.त्यांच्या त्या जिद्दीला ६८ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना मानाचा मुजरा आणि लाख लाख शुभेच्छा.

सागर रामभाऊ तायडे ९९२०४०३८५९,भांडुप मुंबई अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.

# कोकण कुणाचाच नसा..?

रस्ते, रेल्वे यांची इतकी दुर्दशा अन्य प्रांतात खपून गेली असती? आपल्या प्रगतीच्या मार्गावर इतके खाचखळगे का याचा विचार कोकणवासीयांस स्वत:लाच करावा लागणार आहे.. रस्ते, रेल्वे यांची इतकी दुर्दशा अन्य प्रांतात खपून गेली असती? आपल्या प्रगतीच्या मार्गावर इतके खाचखळगे का याचा विचार कोकणवासीयांस स्वत:लाच करावा लागणार आहे.. सैल नियमनांच्या कुडमुडय़ा भांडवलशाहीत कशास प्राधान्य द्यावयाचे याचे काही पायंडे पडून जातात. ज्यात गुंतवणूक करावयाची, ज्यास महत्त्व द्यावयाचे, ज्याकडे लक्ष द्यावयाचे तो घटक ग्राहक हवा हा यातील मूलभूत नियम. म्हणजे जो समाजघटक हा थेट ग्राहक नसतो, ज्या समाजघटकातील गुंतवणुकीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काही फायदे नसतात, त्या घटकाकडे व्यवस्थेचे सहसा लक्ष जात नाही. अशा ठिकाणी शासकीय व्यवस्था हीदेखील बाजारपेठीय व्यवस्थेची गती कशी कायम राहील याच प्रयत्नांत असते. जे जे बाजारपेठ नाही त्यास महत्त्व नाही, असा हा साधा हिशेब. उदाहरणार्थ आदिवासी. हा घटक व्यक्ती म्हणून कोणाचाही ग्राहक नाही तसेच समूह म्हणूनही दखल घेतली जावी अशी त्यांची क्रयशक्ती नाही. हे त्यांच्या सर्वपक्षीय सर्वकालीन रखडत्या विकासामागील कारण. त्यांच्या विकासात ना बाजारपेठेस रस असतो आणि ना या बाजारपेठेस आधार देणाऱ्या शासन व्यवस्थेस त्यांच्यात रुची असते. याचा अर्थ असा की व्यक्ती वा व्यक्तींचा समूह जोपर्यंत स्वत:स बाजारपेठेच्या टप्प्यापर्यंत आणत नाही तोपर्यंत त्यांच्या विकासास गती येत नाही. याचे ताजे, जिवंत आणि धगधगते उदाहरण म्हणजे काही ना काही कारणाने कमालीच्या हालअपेष्टा भोगत असलेले कोकणवासीय. कोकणमार्गे जाणारा महामार्ग इतकी वर्षे का रखडतो? आहे त्या रस्त्यांची इतकी भीषण अवस्था कशी काय होऊ शकते? आणि रेल्वेने कोकणात जाऊ पाहणाऱ्यांचीही वर्षांनुवर्षे इतकी परवड कशी होते? या तीनही प्रश्नांचे उत्तर एकच आहे. कोकण प्रांत बाजारपेठ म्हणून उभा राहू शकला नाही, हे कोकणवासीयांच्या हालअपेष्टांमागील कटू सत्य. ना मोठे उद्योग ना कोणती बाजारपेठ अशा या कोकण प्रांताचे दुसरे दुर्दैव म्हणजे राजकीयदृष्टय़ा हा प्रांत अनाथ आहे. कार्यक्षम नेतृत्व उभे राहण्यासाठी परिणामकारक बाजारपेठ असावी लागते आणि परिणामकारक बाजारपेठ असेल तर तेथून उभे राहणारे नेतृत्व हे अ-बाजारपेठीय प्रांतांपेक्षा अधिक परिणामकारक असते. हे दुष्टचक्र आहे. राज्यापुरता विचार करावयाचा झाल्यास इतर प्रांतांच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्री नेतृत्व हे अधिक प्रभावशाली का हे यातून ध्यानात येईल. यावर काही मग बिहारचे काय, असा प्रश्न उपस्थित करतील. तो योग्य. बिहार हा प्रदेश आर्थिक बाजारपेठ नाही हे खरे. पण राजकीय बाजारपेठेत बिहारचे महत्त्व किती हे सांगण्यास तज्ज्ञ असण्याची गरज नाही. तथापि कोकण प्रांताचा समावेश यात कोठे करणार? ना राजकीय नेतृत्व ना आर्थिक बाजारपेठ. तेव्हा कोकणवासीयांच्या समस्या, त्यांचे प्रश्न अनुत्तरितच राहतात यात आश्चर्य ते काय आणि ते प्रदीर्घ काळ तसेच राहिले तर यात धक्कादायक तरी काय? गणपती उत्सव सुरू झाल्यापासून या प्रांताच्या दुरवस्थेचे दशावतार दिवसागणिक समोर येताना दिसतात. ते पाहून/वाचून त्या प्रांताशी संबंधित चडफडतात आणि अन्य प्रांतीय त्यांस हसतात वा त्याकडे दुर्लक्ष करतात. पुढील वर्षांच्या गणेशोत्सवापर्यंत या वास्तवात काडीचाही बदल होणारा नाही. बांधल्या जाणाऱ्या महामार्गाचा काही भाग सुरू होईल/ न होईल. झाला तरी कोकणवासीयांच्या हालअपेष्टांची नवी एखादी आघाडी उघडेल. या वास्तवात फार काही बदल होण्याची शक्यता नाही.तेव्हा आपल्या प्रगतीच्या मार्गावर इतके खाचखळगे का याचा विचार आज ना उद्या कोकणवासीयांस स्वत:लाच करावा लागणार आहे. या प्रांतातील तरुण पिढी उपजीविकेसाठी सर्रास (किमान) मुंबई गाठते. कारण तेथे राहून उन्नतीची काही शक्यता नाही. शहरात राहावयाचे आणि आपल्या गावाच्या नावे कुढायचे हे कोकणवासीयांचे प्राक्तन गेले शतकभर तरी असेच आहे.'मनीऑर्डर इकॉनॉमी' ही या प्रांताची ओळख. ती अद्यापही पुसली गेलेली नाही. वर्षभर मुंबईत काढून आणि चवथ किंवा/ आणि शिमग्यास पालखी नाचवण्यापुरते गावाकडे जायचे हा या मंडळींचा शिरस्ता. दोन-पाच किंवा फार फार तर दहा दिवसांपुरते आपल्या गावात येणाऱ्याच्या गावाच्या विकासात कोणास रस असणार? जे गावाकडे राहतात त्यातील बहुसंख्यांच्या मनी अनिच्छा असते आणि जे 'ग्राहक' होऊ शकतात ते गावातून स्थलांतरित होतात. परिणामी अशांचे प्रदेश 'बाजारपेठ' म्हणून विकसित होऊच शकत नाहीत. बरे, मुंबईतही यापैकी अनेक मंडळी काही अधिकारपदांवर, मोक्याच्या जागांवर आहेत असेही फार नाही. एके काळी 'बाले' म्हणवून घेण्यात यांची एक पिढी गेली आणि नंतर 'चाकरमानी' म्हणवून घेण्यात यांनी धन्यता मानली. मुंबईतही प्रभावशाली म्हणता येईल असे कोकणवासीयांचे राजकीय नेतृत्व उभे राहू शकले नाही, ते यामुळे. जवळपास सर्वच राजकीय पक्षांस कार्यकर्ते अव्याहत पुरवण्याचे काम मात्र कोकण प्रांताने इमानेइतबारे केले. पण यातील बरेच जण बराच काळ वा आयुष्यभर कार्यकर्तेच राहिले. नेतृत्वाच्या मोक्याच्या जागा त्यांना कधी मिळालेल्या नाहीत. परिणामी राजकीय पक्षांनीही कोकणची उपेक्षाच केली. यात धक्कादायक असे काही नाही.याचे कारण कोकण प्रांतातील राजकीय गुंतवणुकीचा आर्थिक लाभांश काही नाही. या प्रांतात काही उद्योगधंदे येत आहेत वा गुंतवणुकीची नवनवी क्षेत्रे या भूभागात विकसित होत आहेत असे काहीही नाही. उलट असा काही प्रयत्न झालाच तर या प्रांताची पहिली प्रतिक्षिप्त क्रिया असते तीच विरोधाची. काही करून दाखवण्यापेक्षा करून दाखवणाऱ्यास आडवे कसे केले यात या प्रांतातील अनेकांस आनंद. एकंदरीत 'मोडेन पण वाकणार नाही' हा बाणा! खरे तर यात अभिमान बाळगावा असे काहीही नाही. कितीही शौर्यदर्शक वाटले तरी हे आभासी शौर्य मिरवणारे अंतिमत: मोडतात आणि त्यांस वाकावेही लागते. यांच्या आविर्भावामुळे कोकणात जाण्यास गुंतवणूकदार कचरतात. आपण कोकणच्या मुळावर उठलेलो आहोत आणि येथील सृष्टिसौंदर्यास, हापूस आंब्यांच्या मोहोरास आणि समुद्रातील मत्स्यजीवनास आपल्या गुंतवणुकीने बाधा येईल हे किटाळ हे उद्योजक तरी किती काळ सहन करणार? वास्तविक कोकणी हापूसला आता अनेक अन्यप्रांतीय हापुसांची स्पर्धा सुरू झालेली आहे आणि येथील सागरी माशांस अन्य प्रांतांतील मत्स्यशेतीचे आव्हान उभे राहू लागले आहे

# नारी शक्ती वंदन बिल आणि वास्तविकता..

महिलांनी प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी भारतीय संविधानाने प्रत्येक स्त्रियांना बहाल करून व त्याचे संरक्षण करून महीलांना वंदनच नाही तर सन्मान ही केला आहे. शिक्षण नोकरी मध्ये आरक्षण देऊन महिलांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाल्याने प्रत्येक क्षेत्रात महिलांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. बोलण्यापासुन तर अधिकारी होण्यापर्यंत सर्व हक्क अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांनी देऊन पुरुषांच्या रांगेमध्ये समान पातळीवर स्थान दिले. हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून महिलांना सोन्याचे व सन्मानाचे दिवस येत असल्याने हिंदु कोडबिलाला कडाडून विरोध करणारे व महिलांना हक्क अधिकार नाकारणारे आजही सत्तेत आहेत. परंतु हिंदू कोडबिल वेळेवर पास होत नाही म्हणून महिलांच्या माना सन्मानासाठी व हक्क अधिकारासाठी मंत्रीपदाचा त्याग करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव महापुरुष होत. महिलांच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी वेळोवेळी उपाययोजना कराव्यात यासाठी संविधानामध्ये तरदुत केली. परंतु महिलांनी संविधान वाचले नाही आणि सरकारने कधी समजून सांगितले नाही. महिलांना हक्क अधिकार, मान सन्मान देऊन त्याचे संरक्षण करण्याचे काम भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. परंतु याची जाणीव महिला आणि बहुतांश लोकांना राहलीच नाही. महिलांना हक्क अधिकार बहाल करणारे महामानव अजूनही महिलांना कळाले नाही हि शोकांतिका आहे. आता भारत सरकारने नारी शक्ती वंदन बिल संसदेमध्ये मंजूर करून महिलांचा सन्मान करण्याचे ठरवले. परंतु मुळ मुद्दा हा आहे की बिल मंजूर करून नारी शक्तीला वंदन होणार आहे का? बिला व्यतिरिक्त या सरकारने महिलांचा सन्मान होईल असे काम केले आहेत का? बिल मंजूर करून महिलांना संसदेमध्ये स्थान देणे योग्यच आहे. परंतु राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून घराणेशाही महीलानांच संधी मिळाली तर राजकीय आरक्षण कुचकामी ठरेल. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कर्तृत्ववान महिलांना आरक्षणाचा लाभ झाला तर ते आरक्षण मजबूत ठरेल. मुख्य मुद्दा हा आहे की नारी शक्तीला वंदन बिलाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकार ने वास्तविक पणे महिलांचा सन्मान किती केला याची ही चर्चा होणे आवश्यक आहे. कारण केवळ निवडणूकी पर्यंत वातावरण चांगले करण्याचा प्रयत्न करून महिला अत्याचार आपण विसरू शकत नाही. महिला अत्याचार सर्व सामान्य लोकांनी केले आणि सरकारने न्याय दिला तर अत्याचाराचे प्रमाण कमी होते पण येथे अत्याचार करणारे सत्ताधारी पक्षाशी संबधित असतील आणि सरकार न्याय देत नसेल तर याला महिला सन्मान म्हणायचे का? बिलकीश बानो बलात्कार आरोपींना तुरुगांतुन बाहेर काढून त्यांचे स्वागत करायचे आणि पेडे वाटायचे याला हे कृत्य संस्कृती मध्ये तरी बसते का? बलात्कार आरोपींना तुरुंगातून सुटका करणे आणि पेडेवाटून आनंद व्यक्त करणे असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य सत्ताधारी पक्षाकडून होत असेल तर नारी वंदन बिलाचा काय फायदा? सरकारने बलात्कारी आरोपींना सोडून नेमकं काय साध्य केले? असे अनेक प्रश्न आहेत ज्याचे उत्तर सरकार देणार नाही परंतु कृत्य हे नैतिकता, जबाबदारी यांच्या विरूद्ध आहेत. सरकारने वास्तविक पणे महिलांचा सन्मान केल्याचे दाखले शोधुनही सापडणार नाहीत. हाथरस मधील घटना आठवली तर आजही अंगावर काटा येतो. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून रात्रीच जाळून टाकले जाते. आणि आरोपी ना शिक्षा होण्यासाठी आंदोलन करावे लागते. मिडिया सोशल मिडियावर बंधने घालुन दबाव आणला जातो. तेव्हा सरकारला महिला विषयी किती आदर आहे याची प्रचिती येते. जागतिक पातळीवर कुस्ती मध्ये देशाला सुवर्ण पदक मिळवून देणाऱ्या महिला कुस्ती खेळाडू कुस्ती संघाचे अध्यक्ष यांच्या वर लैंगिक शोषणाचे आरोप करूनही कार्यवाही होत नाही. महिला खेळाडू एवढे गंभीर आरोप, पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल होणे अपेक्षित असताना ही आरोपपत्र दाखल होत नाही. ही गंभीर बाब असुनही सरकार जर दखल घेत नसेल तर याला काय म्हणायचं? उलटपक्षी जागतिक पातळीवरील महिला खेळाडू आरोपीची चौकशी होऊन शिक्षा व्हायला पाहिजे या साठी आंदोलन केले जाते. परंतु महिला खेळाडूचे संवीधानीक पद्धतीचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी महिलांची जमीनीवरून फरफटत नेले जाते. महिला आंदोलन करताना आंदोलन ठिकाणचे स्वच्छता गृह, पाण्याची सुविधा, इलेक्ट्रीकल कनेक्शन सर्व सुविधा बंद करुन सरकार माणुसकी हीन वागून जेव्हा महिलांची अवहेलना करतात, ही अवहेलना हा अवमान नारी शक्ती वंदन बिल भरून काढणार का? जे सरकार देशाचा गौरव करणाऱ्या महिलांचा सन्मान करू शकत नाही ते सरकार नारी शक्ती वंदन बिल मंजूर करून नेमकं काय सिध्द करणार आहे? केवळ बोलुन निवडणूकीच्या तोंडावर मताधार मिळवण्यासाठी नारी शक्ती वंदन च्या घोषणा करून चालणार नाही तर नारी शक्ती ला वास्तवात वंदन झाले पाहिजे तरच या महीलांचा सन्मान होईल. बिल मंजूर करून सरकारने महिलांची केलेली अवहेलना भरून काढू शकत नाही. महिलांचा सन्मान हा कागदावर नाही तर मनामध्ये, नितीमत्तेमध्ये आणि संस्कारामध्ये पाहिजे. आज नारीशक्ती वंदन बिलावर चर्चा करून आम्ही महिलांचा सन्मान करतो असे म्हणणारे लोक जर मनिपुर मध्ये दोन महिलांवर बलात्कार करून नग्न धिंड काढली जाते त्यावर सरकार किंवा सरकार च्या वतीने कोणीच बोलत नाही. अशा लोकांना महिला सन्मानावर बोलण्याचा नैतिक अधिकार आहे का? दिड महिन्या पासून मनिपुर जळत होते, हजारो कुटुंब वनवन फिरत होते त्या मध्ये महीलांची अवहेलना झाली असेल तर त्यावर सत्तेत असलेले लोक एकही शब्द बोलत नाहीत, एकही जबाबदार व्यक्ती नैतिक जबाबदारी घेऊन मनिपुर ला भेट देत नसतील आणि त्या विषयावर बोलायला वेळ नसेल तर असे सरकार खरचं महिलांचा सन्मान करते यावर कोणाचा विश्वास बसेल? महिलांवर सरकारच अन्याय अत्याचार करून त्यांना न्याया पासून प्रवृत्त करत असेल तर ते सरकार सन्मान नेमका कोणत्या महिलांचा करणार? सध्याचे सरकार महिलांचा सन्मान करतेय असे म्हणणे म्हणजे मोठा विनोदच आहे. कारण नविन संसद भवनाच्या उद्घाटन कार्यक्रम सोहळ्याला देशाच्या राष्ट्राध्यक्ष महामहीम द्रोपती मुर्मु यांनाच बोलावले जात नाही. राष्ट्राध्यक्ष यांना कार्यक्रमाला बोलावले तर प्रधानमंत्री यांना उद्घाटन करता येणार नाही म्हणून राष्ट्राध्यक्ष यांना डावलून महिलांचा सन्मान केला का? देशाला महिला राष्ट्राध्यक्ष असताना त्यांना डावलून कार्यक्रम केला जात असेल तर सरकार महिलांचा सन्मान करणार तरी कसा? नारी शक्ती वंदन बिल केवळ महिलांना खुश करून मताचे राजकारण केल्या जाते. महिलांचा थोडा जरी सन्मान केला असता तर राष्ट्राध्यक्ष यांना डावलून नवीन संसद भवनाचे उद्घाटन केलेच नसते. जर संसद भवनाचे उद्घाटन शासकीय प्रोटोकॉल नुसार जरी केले असते तर संपूर्ण जगाला भारताच्या राष्ट्राध्यक्ष यांच्या बद्दल माहिती होऊन महिलांचा सन्मान वाढला असता. परंतु राष्ट्राध्यक्ष द्रोपती मुर्मु यांना शासकीय कार्यक्रमात डावलून जगात भारताचे महत्त्व कमी केले. नवीन संसद भवनाचे उद्घाटन द्रोपती मुर्मु यांना डावलून केले तर महीला या दुय्यम आहेत हेच जगासमोर सिद्ध करून दिले. महिला कुस्ती खेळाडू आंदोलन करत असताना आरोपींना शिक्षा होत नाही. महिला कुस्ती खेळाडू यांना न्याय मिळत नाही म्हणून आंदोलनाची दखल घेत भारतीय कुस्ती संघाला जागतिक यादी मधुन काढून टाकले गेले आहे. हा महिलांचा सन्मानच आहे का? थोडक्यात काय तर महिला वंदन नावाच्या खाली बिल मंजूर करून महिलांचा सन्मान होणार नाही. महिलांचा सन्मान होण्यासाठी महिलांचा माणूस म्हणून स्विकार करणे आवश्यक असते. आज महिला शाळा, कामाचे ठिकाण, मंदिर कोणत्याही ठिकाणी नाही. जात धर्म पाहून महिलांचे शोषण केल्या जाते, जात धर्म बघून महिलांसाठी न्याय माधितला जातो. महिलेला आजही दुय्यम समजून बाजूला केले जाते. विधवा, घटस्पोटीत महिलांच्या हातून चांगले काम करण्यावर बंधने आणली जातात. अशी परिस्थिती देशात असताना महिलांचा सन्मान होईल असे म्हणणे म्हणजे केवळ पोकळ गप्पाच होत. महिलांना सुद्धा आपला मान सन्मान कोणी व कसा दिला? आपला मान सन्मान नेमके कोण करत आहे याची जाणीव होणे आवश्यक आहे. फक्त बिलाला नाव देऊन महिलेचा सन्मान होत नाही, महिलेचा सन्मान करण्यासाठी मनात प्रामाणिक पणा व योग्य नितीमत्ता आवश्यक असते. म्हणून महिला आरक्षण बिल खरचं चांगले आहे. परंतु हे लागु होण्या आधी प्रलंबित महिला खटले निकाली काढून महिलांना न्याय देऊन आरोपींना कठोर शिक्षा झाली आणि नारी शक्ती वंदन बिलाच्या माध्यमातून सध्या आमदार खासदार असलेल्याच घरातील महिला आमदार खासदार होतील तर खरंच सर्वसामान्य महिलांचा सन्मान होईल का? हा प्रश्न कायम राहील.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# महिनाभर एकही चॉकलेट खाल्ले नाही तर शरीरात काय बदल होतील? आहारतज्ज्ञ सांगतात.

आहारतज्ज्ञांच्या मते– तुम्ही महिनाभर चॉकलेट खाणं बंद करता तेव्हा तुमच्या शरीरात अनेक बदल होऊ शकतात. लहानांपासून मोठ्यापर्यंत सगळ्यांना चॉकलेट खायला आवडतं. त्यामुळे चॉकलेट खाणं सोडून देणं अनेकांना स्वप्नवत आणि अशक्य वाटू शकतं. त्यामुळे ते कायमचं सोडून देण्यापेक्षा महिनाभर खाणं बंद करण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. कारण– आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांच्या मते, जेव्हा तुम्ही महिनाभर चॉकलेट खाणं बंद करता, तेव्हा तुमच्या शरीरात अनेक बदल होऊ शकतात.



तुमची जीभ गोड चवीसाठी अधिक संवेदनशील होऊ शकते; जे पदार्थ तुम्हाला पूर्वी खूप गोड वाटायचे. कदाचित त्या पदार्थांचा तुम्ही आनंद घेऊ शकाल. चॉकलेटमुळे काही व्यक्तींच्या त्वचेवर पुरळ येऊ शकतात. त्यामुळे ते खाणं टाळल्यास तुमच्या त्वचेतही काही सुधारणा होऊ शकते. सिंघवाल यांच्या म्हणण्यानुसार, तुम्हाला गोड आणि उच्च कॅलरीयुक्त पदार्थ खाण्याची जास्त इच्छा होणार नाही. तर डॉ अभिषेक गुप्ता, इमर्जन्सी मेडिसिन्स, रिजन्सी हॉस्पिटल यांनी सांगितलं की, काही लोकांना चॉकलेट खाणं बंद केल्यानंतर सुरुवातीला चॉकलेट खाण्याची इच्छा होणं आणि मूड बदलांचा अनुभव येऊ शकतो. कारण– त्यांच्या शरीरानं चॉकलेटच्या मूड वाढवणाऱ्या संयुगांच्या अभावाशी जुळवून घेण्यास सुरुवात केलेली असते.महिनाभर चॉकलेट न खाण्याचे शरीराला काय फायदे होऊ शकतात ते जाणून घेऊ या.महिनाभर चॉकलेट खाणं बंद केल्याचे अनेक फायदे होऊ शकतात.डॉ. गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार चॉकलेटचं सेवन कमी केल्यानं शरीरातील कॅलरी आणि साखरेचं प्रमाण कमी होऊ शकतं. ते पुढे म्हणाले, चॉकलेट खाणं बंद केल्यानं दात किडण्याचा धोका कमी होऊन दातांचं आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. तर, सिंघवाल यांनी सांगितलं, चॉकलेटमध्ये कॅलरीजचं प्रमाण जास्त असल्यामुळे ते खाणं टाळल्यानं कॅलरी कमी होतात; ज्यामुळे तुमचं वजन कमी होण्यास मदत होते.चॉकलेट खाणे बंद केल्याची लक्षणे काही लोक पहिल्यांदा चॉकलेट खाणं बंद करतात तेव्हा लगेचच त्यांची चिडचिड होणं किंवा चॉकलेट खाण्याची इच्छा होणं, अशी लक्षणं दिसू शकतात; परंतु ही लक्षणं वेळेनुसार कमी होतात, असं डॉ. गुप्ता यांनी सांगितलं. तर सिंघवाल यांच्या म्हणण्यानुसार, काही लोकांना मूड बदलणं किंवा डोकेदुखी होणं अशा लक्षणांचाही अनुभव येऊ शकतो, तसेच जर तुम्ही याआधी नियमितपणे चॉकलेट खात असाल, तर तुमच्यामध्ये ही लक्षणं मोठ्या प्रमाणात दिसू शकतात. त्यामुळे अशा वेळी तुम्हाला चॉकलेटला आरोग्यदायी पर्याय असणारे पदार्थ खाण्यावर भर देणं गरजेचं आहे.चॉकलेटला आरोग्यदायी पर्यायी पदार्थ कोणते? आहारतज्ज्ञ सिंघवाल आणि डॉ. गुप्ता यांच्या मते– चॉकलेटला अनेक आरोग्यदायी पर्याय आहेत. उच्च कोको सामग्री (७० टक्क्यांपेक्षा अधिक) असलेल्या डार्क चॉकलेटसारख्या पर्यायांचा तुम्ही विचार करू शकता; ज्यामध्ये कमी साखर आणि जास्त अँटिऑक्सिडंट्स असतात.तसेच आंबा, अननस, ब्लॅकबेरी यांसारख्या नैसर्गिक गोड फळांचाही तुम्ही विचार करू शकता.खजूर आणि नट यांसारख्या आरोग्यदायी घटकांचा वापर करून घरगुती मिठाई सेवन करू शकता.चॉकलेट खाणे कोणी टाळावे? डॉ. गुप्ता यांच्या मते, गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स आजार (त्रएठऊ) किंवा पूर्वी मायग्रेनचा त्रास असलेल्या लोकांनी याबाबत सावध असायला हवं. कारण– चॉकलेट्स काही प्रकरणांच्या लक्षणांमध्ये वाढ करू शकतात. तसेच जे कमी साखरेचा आहार घेतात, त्यांनी चॉकलेटच्या सेवनावर बारकाईनं लक्ष ठेवणं गरजेचं आहे. तर सिंघवाल यांनी सांगितलं की, चॉकलेट खाल्ल्यानं ज्या लोकांची वैद्यकीय स्थिती बिघडू शकते, जसे की खइड (मलमूत्र विसर्जनाच्या वेळी त्रास होणे) अशा लोकांनी ते खाणं टाळावं.

# ऑस्टिओआर्थरायटिस म्हणजे काय?

या लेखात आपण ऑस्टिओआर्थरायटिस बद्दल अधिक जाणून घेऊया. मागच्या लेखात आपण ऑस्टिओआर्थरायटिसमध्ये गुडघ्यात नेमके कसे आणि कोणते बदल होतात ते पहिलं या लेखात आपण ऑस्टिओआर्थरायटिस बद्दल अधिक जाणून घेऊया.कारटीलेज हळूहळू विरून जायला सुरुवात झाल्याने दोन हाडांमधली जागा (जॉइंट स्पेस) कमी होऊ लागते, परिणामी वेगवेगळ्या हालचाली दरम्यान मांडीचं हाड आणि पोटरीचं हाड एकमेकांवर घासले जातात. हेही वाचा क्शरश्रींह डशिलळरश्र: ऋतूसंधीकाळात तब्येत नीट ठेवणं का महत्त्वाचं?असं सतत होऊ लागलं की हाडाच्या घासल्या जाणार्या पृष्ठभागावर छोटे उंचवटे तयार होतात याला ऑस्टियोफाइट्स किंवा बोन स्पर असं म्हणतात. मोडेरट टु सिवीअर ऑस्टिओआर्थरायटिसमधे हे उंचवटे बर्याच वेळा एक्स रे वरही दिसतात. सौम्य ऑस्टिओआर्थरायटिस गुडघ्यात अधून मधून जाणवणारी पुसटशी वेदना किंवा फक्त एका विशिष्ट हालचालीपूर्ती मर्यादित असणारी वेदना कारटीलेजमध्ये होणारे बदल नुकतेच सुरू झालेले असतात, बोन स्पर्स या टप्प्यात तयार झालेल्या नसतात हा टप्पा अतिशय महत्वाचा ठरतो कारण या टप्प्यात योग्य व्यायाम सुरू केले आणि व्यक्तिनुरूप जीवनशैलीतील बदल केले तर वर सांगितलेल्या प्रक्रियांना अटकाव घालता येतो.
मात्र जर या टप्प्यात असलेल्या रूग्णाला सरसकट चालणं, खाली बसणं, अशा हालचाली पूर्णपणे बंद करण्यास सांगितल्या तर यामुळे रुग्णाचा दीर्घकालीन त्रास वाढण्याची शक्यता असते. या टप्प्यात अनेकांना योग्य ती माहिती न मिळाल्यामुळे (किंवा चुकीची माहिती मिळाल्यामुळे) काही शारीरिक हालचाली या मोडीफाय न होता पूर्णच बंद होऊन जातात. या टप्प्यात रुग्णाच्या मनात हालचालींविषयी सगळ्यात जास्त भीती (कायने सिओफोबिया) आणि गैरसमज निर्माण होऊ शकतात शिवाय वेदनेची भीतीसुद्धा मनात घर करू शकते.मध्यम ऑस्टिओआर्थरायटिस गुडघ्यात विशिष्ट हालचालींना जाणवणारी पुसटशी वेदना आता वारंवार आणि तीव्रपणे जाणवू लागते. उठबस करताना वेदना अधिक तीव्र होते.
कारटीलेजमध्ये होणारे बदल जास्त प्रमाणात आणि वेगाने होतात, कारटीलेज खाली असणारा हाडाचा पृष्ठभाग काही ठिकाणी उघडा पडतो.
हाडावर उंचवटे (बोन स्पर्स) तयार होऊ लागतात, काही विशिष्ट भागात त्यांची संख्या वाढते.याच टप्प्यात सांध्यामधील वंगण देखील कमी होऊ लागतं.या टप्प्यात व्यायाम, जीवनशैलीतील बदल, ऑर्थोपेडिक डॉक्टरांकडून दिले जाणारे वेदांनाशामक औषधी याचा उपयोग होतो.तीव्र ऑस्टिओआर्थरायटिस कारटीलेजचा ऱ्हास झाल्यामुळे सांध्याची हालचाल ही कारटीलेज टु कारटीलेज न होता बोन टू बोन होते.दोन हाड एकमेकांवर घासली जातात.बोन स्पर्स मोठ्या होतात आणि जास्त प्रमाणात दिसू लागतात.
वेदनांची तीव्रता वाढते, रुग्णाच्या चालण्याची पद्धत बदलते, काही रुग्णांमध्ये गुडघ्याला आतल्या बाजूने बाक येतो.रुग्णाच्या दैनंदिन आयुष्यातील हालचाली आणि क्रिया मर्यादित होतात.रात्री झोपताना वेदना अधिक तीव्रतेने जाणवतात.या टप्प्यात टोटल नी रेप्लेसीमेंट म्हणजेच गुडघ्याचा सांधा बदलण्याची शस्त्रक्रिया करावी लागते अर्थातच शस्त्रक्रियेचा निर्णय हा रुग्णाचा वय, इतर आजार आणि इतर महत्वाचे घटक बघून ऑर्थोपेडिक डॉक्टरद्वारे घेतला जातो.या टप्प्यात शस्त्रिक्रियेआधीचे ज्याला प्रीहबिलिटेशन आणि नंतरचे व्यायाम ज्याला रीहॅबिलिटेशन असं म्हणतात. या दोन्ही गोष्टींना यात अनन्यसाधारण महत्व असतं. ऑस्टिओआर्थरायटिसचे फिजिओथेरपी उपचार पुढच्या भागात!

# तूर,मूग की उडीद? ; यापैकी एक आहे मधुमेहाच्या रूग्णांसाठी संजीवनी बूटी, कशी खायची ते पहा

घरोघरी मातीच्या चुली, ही म्हण तुम्ही अनेकदा ऐकली असेल. ती प्रत्येक घरातल्या व्यक्तीच्या स्वभाव आणि वादावर बोलली जाते. पण, ही म्हण आता एका आजाराबाबतीतही म्हटली जाऊ शकते. तो आजार म्हणजे मधुमेह.
होय, आजकाल घरोघरी मधुमेहाचे रूग्ण तयार होत आहेत. काही लोकांना अनुवंशिक तर काहींना खाण्याच्या सवयींमुळे मधुमेहाची सुरूवात होते. मधुमेही रूग्णांसाठी वेगळं डायट फॉलो करावं लागतं. त्यांना अनेक पदार्थ खाण्याच्या इच्छेवर पाणी फिरवावं लागतं. हा आजारासाठी अनेक औषधे असली तरी तुम्हाला तुमच्या खाण्यावर नियंत्रण मिळवावं लागतं.
तुम्हीही मधुमेहाचा सामना करत असाल, तर तुम्हाला काय खायचं हे कोड पडलं असेल. तर आम्ही तुम्हाला सांगतो की, या डाळीचा समावेश आहारात केल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळवता येऊ शकतं. कोणती डाळ खायची
घरात सगळ्या डाळींच्या भाज्या, आमटी बनवल्या जातात. त्यात अनेक प्रथिने आणि पोषक तत्वे असतात. त्यामुळेच त्याचा भाजी, आमटी, वेगवेगळे स्नॅक्स बनवून खाल्ले जातात. मधुमेही रूग्णांनी उडीद डाळ खाणे फायद्याचे ठरणार आहे.




उडीद डाळीचे गुणधर्म कोणते?
उडीद डाळ चवीला उत्तम असण्यासोबतच आरोग्यासाठीही परिपूर्ण आहे. त्यात मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि लोह सारखे आवश्यक पोषक घटक आढळतात. या डाळीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जे तुमची भूक नियंत्रित ठेवते, तुमचे पोट जास्त काळ भरलेले राहते. त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स देखील कमी आहे.
जो रक्तातील साखरेची पातळी वाढू देत नाही. जर तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल तर तुम्ही तुमच्या आहारात उडीद डाळीचा समावेश करू शकता, ज्यामुळे तुमची रक्तातील साखर नियंत्रणात राहते.
उडीद डाळ तुम्ही अशा पद्धतीने खाऊ शकता
खिचडी
ज्यांना मधुमेह आहे त्यांच्यासाठी खिचडी हा अतिशय आरोग्यदायी आहार आहे. खिचडी ही विविध प्रकारच्या डाळींपासून बनवली जाते. यासाठी तुम्ही चणा डाळ, मूग डाळ किंवा उडीद डाळ वापरू शकता. त्यामध्ये प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. खिचडी चविष्ट बनवण्यासाठी तुम्ही भाज्यांचाही वापर करू शकता, पण ते बनवण्यासाठी कमी तेल वापरा.
उडीद डाळीचा पराठा
मधुमेहाच्या रुग्णांसाठी नाश्ता खूप महत्त्वाचा आहे. जर तुम्हाला काही चविष्ट खायचे असेल तर तुम्ही उडीद डाळीपासून बनवलेला पराठा खाऊ शकता. तुम्ही त्यात मेथीची पानेही मिसळू शकता, जे मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे. वाढत्या साखरेवर नियंत्रण ठेवण्यासाठी या दोन्ही गोष्टी उपयुक्त आहेत.
कढी भात
भात आणि कढी कोणाला आवडत नाही? उडदाच्या डाळ कढी मधुमेहाच्या रुग्णांसाठी बनवता येते. यामध्ये दही आणि इतर मसाले वापरता येतात. उडीद डाळ कढीमध्ये बेसना–चा वापर केला जात नाही. उडीद डाळ कढीचा आस्वाद भातासोबत घेता येतो.

## 'गोल्डन मॅन'साठी मुंबईकर एकवटले, पोलिसांच्या दमदाटीविरोधात थेट नडले; स्ट्रीट आर्टिस्टने तखऊएजव्दारे सांगितलं वास्तव

त्रेश्चवशप चरप : स्ट्रिट आर्टिस्ट गिरजेश गौड याने सांगितल्यानुसार पोलीस कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत होता. पोलीस कर्मचाऱ्याने गोल्डन मॅनशी हुज्जत घालायला सुरुवात केली तेव्हा जमलेल्या मुंबईकरांनी पोलिसांना अडवण्याचा प्रयत्न केला. द लिव्हिंग स्टॅच्यु किंवा गोल्डन मॅन म्हणून प्रसिद्ध असलेल्या गिरजेश गौड या स्ट्रिट आर्टिस्टला वांद्रे येथील बॅण्ड स्टॅण्ड येथे मद्यधुंद अवस्थेतील पोलीस कर्मचाऱ्याकडून मारहण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गिरजेश गौड याने यासंदर्भातील व्हिडीओ त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केला आहे. बॅण्ड स्टॅण्डवर झालेल्या या घटनेबाबत त्याने इन्स्टाग्राम पोस्टद्वारे माहिती दिली. हा व्हिडिओ काल रात्री ८ च्या सुमारास वांद्रे बँडस्टँडवर शूट करण्यात आला आहे. हा मद्यधुंद पोलीस हवालदार माझ्याकडे आला आणि त्याने त्याच्या लाठीने माझ्यावर हल्ला केला. मी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला आणि मला का मारतोय असे विचारले तर त्याने माझ्यावर शिवीगाळ केली. नंतर सर्व लोकांसमोर त्याने माझी मान दाबून धरली आणि मला खेचू लागला. त्यामुळे माझा श्वास रोखला गेला. मला पोलीस ठाण्यात नेऊन गुन्हा दाखल करण्याची धमकीही त्याने दिली. मी एक कलाकार असून मुंबईत माझं कोणीच नाही. खर्पीीरसीरा (चाहते) कुटुंबाशिवाय मला कोणीही नाही. मी एकमेव आर्टिस्ट नसून मुंबईत असे अनेक कलाकार आहेत, ज्यांचा उदरनिर्वाह अशा स्ट्रिट आर्टवर चालतो. आम्ही आमच्या हक्कांबाबत पोलिसांशी बोललो तर आम्ही गुन्हा केल्याप्रमाणे वागवलं जातं. तुम्हीच आता सांगा आम्ही काय करायला हवं? आम्हाला पाठिंबा द्या आणि हा व्हिडीओ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा, असं त्याने इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हटलं आहे.
स्ट्रिट आर्टिस्ट गिरजेश गौड याने सांगितल्यानुसार पोलीस कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत होता. पोलीस कर्मचाऱ्याने गोल्डन मॅनशी हुज्जत घालायला सुरुवात केली तेव्हा जमलेल्या मुंबईकरांनी पोलिसांना अडवण्याचा प्रयत्न केला.

# शाळा दत्तक योजना आणि नोक-यांच्या कंत्राटीकरणाचा जी.आर.रद्द करा - फकिरा ब्रिग्रेडची मागणी




लातूर(प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये लाखों नौक-यांचा अनुशेष शिल्लक असतांना ६ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने जी.आर.काढून राज्यातील सर्व शासकीय विभागातील सरकारी नोक-यांचे कंत्राटीकरण केले, तसेच महाराष्ट्रातील ६२ हजार सरकारी शाळा, श्रीमंत, भांडवलदार, व्यापारी, उद्योगपतींना दत्तक देण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ रोजी शासनादेश काढून महाराष्ट्रातील गरीब, वंचित,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे आणि महसूल वाढवण्यासाठी दारूच्या दुकानांना मान्यता द्यायची तसेच महाराष्ट्रातील विविध मंदिराना पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन २४०० कोटी रूपये मंजूर करून एस.सी.एस.टी.ओबीसी जातीतील विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्याचे षडयंत्र हे तीनपाई सरकार करीत आहे. याचा फकिरा ब्रिगेडच्या वतीने लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून निषेध व्यक्त करण्यात आला

सध्या केंद्रात आणि राज्यात मनुवादी विचारांचे सरकार सत्तेवर कार्यरत असून यांना विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची नसून ग्रामपंचायत, महानगर पालिका, नगरपरिषदेच्या शाळांची मोक्याची जागा बळकावून तिथे मोठ्या -मोठ्या ईमारती, मॉल्स उभे करायचे आहेत त्यामुळे या शाळा व्यापा-यांना दत्तक देण्याचा घाट या मनुवादी सरकारने घातला आहे असा आरोप फकिरा ब्रिगेडच्या निवेदनात करण्यात आला आहे.सरकारने देशातील एस.सी.एस.टी. ओबीसी.समाजातील विद्यार्थी, सुशिक्षित तरुणांचे आयुष्य उद्धस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे.केंद्र सरकारने कौशल्य विकासाच्या नावाखाली या देशातील बलुतेदारी पध्दत तसेच वर्णव्यवस्था,जातव्यवस्था कायम ठेवण्यासाठीच ही योजना सुरू केली आहे ,तर दुसरीकडे केंद्रात सचिव, उपसचिव, संचालक, उपसंचालक या सारख्या पदांवर सवर्ण समाजातील तरुणांची डायरेक्ट भरती केली जात आहे.या पदांना कंत्राटी पद्धत का लागू नाही असा प्रश्न समाजात उपस्थित केला जात आहे.या मनुवादी सरकारचा खरा चेहरा देशातील जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असून या राज्यात म.फुले यांनी इंग्रजाकडे सक्तीच्या शिक्षणाचा अग्रह धरला, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले,नोक-यात आरक्षण दिले,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून १ते १४ वर्ष वयोगटातील मुलांमुलींना मोफत शिक्षणाची तरतूद केली;परंतु आज या सर्व विचार,धोरणाला मूठमाती देऊन राज्यकर्ते योजना राबवत असल्याचे सिद्ध झाले आहे.याचा निषेध म्हणून आज दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली मा.जिल्हाधिकारी,लातूर यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना फकिरा ब्रिग्रेड च्या वतीने निवेदन देण्यात आले या आंदोलनात प्रा.राजेंद्र लोदगेकर, राज्य कार्याध्यक्ष, फकिरा ब्रिग्रेड,श्रीरंग सरवदे, प्रदेशाध्यक्ष, फकिरा ब्रिग्रेड,मा.श्रीमती उर्मिला नवगिरे, जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी,लातूर,श्रीमती नागिनी थोरात, पार्वती झुंजारे, उस्मानाबाद , संजय विरूळे, किशोर कसबे, सतीश शिंदे,,संतोष पटनुरे, पांडुरंग मस्के, गोविंद धबडगे,सुरेकांत कदम,बाळू पटनुरे, सुदर्शन शिंदे, मुकेश लोंढे, नाना लोंढे, ,अंगद कांबळे, लक्ष्मण खंडाळे, सुरेखा गायकवाड, सुभाष गायकवाड, विकास लोंढे, रमेश लोंढे, अंकुश कांबळे आदी कार्यकर्ते सहभागी झाले

# रेणापूरच्या शेतकरी आंदोलकांना मुंबई मंत्रालयात अटक



लातूर - मराठवाड्यात नदीजोड प्रकल्प राबवून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यात यावा, या व शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील शेतकर्यांनी किसान सेनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोळंगे यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर ते मुंबई मंत्रालय पायी संघर्ष यात्रा काढण्यात आली. मुंबई येथील मंत्रालयात आज ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांना मंत्रालयालयावर मोर्चाचा इशारा दिला होतो. त्यामुळे किसान सेनेचे गजानन बोळंगे व २० ते २५ आंदोलक शेतकरी मंत्रालयात गेले असता. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान विरोधी पक्षाचे कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या आंदोलकांची भूमिका समजावून घेतली व त्यांचे निवेदन स्विकारले.

ताब्यात घेंतलेल्या गजानन बोळंगे, बाबुराव बडे, व्यंकट बोळंगे, गुरुनाथ बोळंगे ,अच्युतराव करमुडे , कोंडीबा नागरगोजे, राजू नागरगोजे, संतराम चिकटे, प्रमोद चिकटे, गोविंद आवळे, संजय गवरे, पांडुरंग केंचे, ईलाई शेख, गणेश खेडकर, सचिन निकम, बसवेश्वर थोंटे, सुरेंद्र भारती, अशोक आगरकर, बळीराम काळे यांना काही वेळानंतर आझाद मैदानावर उपोषणस्थळी आणून सोडण्यात आले.

तीन ऑक्टोंबर मंत्रालयावर मोर्चा जो इशारा दिला होता किसान सेना व शेतकरी यांनी आज आम्हाला मंत्रालयातून अटक करण्यात आली व त्यानंतर सुखरूप सुटका करून आझाद मैदान येथे उपोषणाठिकाणावर सोडण्यात आले. यामध्ये गजानन बोळंगे बाबुराव बडे व्यंकट बोळंगे, गुरुनाथ बोळंगे अच्युतराव करमुडे कोंडीबा नागरगोजे राजू नागरगोजे संतराम चिकटे प्रमोद चिकटे , गोविंद आवळे संजय गवरे, पांडुरंग केंचे, ईलाई शेख, गणेश खेडकर, सचिन निकम , बसवेश्वर थोंटे, सुरेंद्र भारती अशोक आगरकर, बळीराम काळे आदी शेतकरी आंदोलकांचा सहभाग होता.

# कंत्राटी क्षेत्रीय अधिकारी तथा तंत्र सहाय्यक पदासाठी १० ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. ३ (जिमाका) : आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत जिल्हास्तरावर कृषी व अन्न प्रक्रिया संदर्भातील कामकाज पाहण्यासाठी लातूर जिल्ह्याकरिता एक क्षेत्रिय अधिकारी (फिल्ड लेवल ऑफिसर) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रक्रिया) या कंत्राटी पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी १० ऑक्टोबर, २०२३ रोजी सायंकाळी ६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

क्षेत्रीय अधिकारी (फिल्ड लेवल ऑफिसर) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रकिया) या पदासाठी शैक्षणिक आर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून मिळविलेली पदवी (अनिवार्य) बीएससी (ग्री / हॉर्टी), बीटेक (फुड / ग्रो) अनिवार्य आहे. पदव्यत्तर एमबीए (अनुक्रमे प्रधान्य फायनान्स, प्रोड्युक्शन मॅनेजमेंट, बिजनेस) एमटेक (फुड), एमएससी (ग्री, हॉर्टी, फुड) असा प्राधान्यक्रम राहील. एमएससीआयटी अनिवार्य असून संगणकावर कार्यालयीन कामकाज येणे आवश्यक आहे. इंग्रजी, मराठी टायपिंग येणे अनिवार्य आहे. किमान अनुभव किमान २ वर्षे आवश्यक असून मासिक मानधन २८ हजार ८०० प्रति महिना राहील.

या पदासाठी आवश्यक अर्जाच्या अटी व शर्तीनुसार कृषि विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, जुने कलेक्टर ऑफिस शेजारी, दुसरा मजला, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, लातूर येथे अर्ज सादर करावेत.

अर्ज करण्यासाठी अंतिम १० ऑक्टोबर, २०२३ संध्याकाळी ६-०० वाजेपर्यंत आहे. तसेच विहीत कालावधीत या पदासाठी अर्ज प्राप्त न झाल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही, लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर यांनी कळविले आहे.

# सुशील भायजे यांची जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड

रत्नागिरी : येथील युवा नेते व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते सुशील भायजे यांची रत्नागिरीच्या राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

सुशील भायजे हे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते आहेत. आजपर्यंत त्यांनी राजकीय व सामाजिक कामातून आपली राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस प्रती असलेली निष्ठा सिद्ध केली आहे. त्यांच्या या निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची दखल घेऊन पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी त्यांना पद देण्याचे निश्चित केले व वरिष्ठांच्या मतानुसार सुशील भायजे यांची जिल्हा कार्याध्यक्ष



पदी निवड करण्यात आली.

सुशील भाजये यांची जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करताच त्यांना पै- पाहुणे, नातेवाईक आणि मित्र मंडळी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला.

# जिल्ह्यात जिल्हा परिषदेतंर्गत गट-क सरळसेवा भरती परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर दि.३ ( जिमाका ) :- जिल्हा परिषदेतंर्गत गट - क ( वाहन चालक वगळून) सरळ सेवा भरती प्रक्रिया २०२३ परीक्षा ७ ते ११ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील सहा उपकेंद्रांवर ही परीक्षा होणार असून या सहाही परीक्षा परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात ७ ते ११ ऑक्टोबर २०२३ या काळात फौजदारी प्रक्रिया १९७३ चे कलम १४४ अन्वये सकाळी ७.३० ते सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील. नेटीझन्स डिजीटल लातूर, कॉस इन्स्टीट्युट ऑफ कमप्युटर एज्युकेशन लातूर, गुरु ऑनलाईन एक्झाम सेंटर लातूर, स्वामी विवेकानंद इन्स्टीट्युट ऑफ पॉलटेक्निक लातूर, संदिपानी टेक्नीकल कॅम्पस कोळपा लातूर, महाराष्ट्र कॉलेज ऑफ पॉलटेक्नीक निलंगा या उपकेंद्रावर जिल्हा परिषदेतंर्गत गट-क सरळसेवा भरती परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक आदेशामुळे परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्र परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. परीक्षा केंद्राच्या १००मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडुन परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासही त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नांदेड येथील घटनेची मुख्यमंत्र्यांनी घेतली गंभीर दखल चौकशीअंती दोषींवर कारवाई करणार-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, दि. ०३ : नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात झालेल्या घटनेची शासनाने गंभीर दखल घेतली असून या घटनेची चौकशी करुन त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मंत्रालय येथे आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, याबाबतीत प्राथमिक माहिती घेतली असता लक्षात आलं की, रुग्णालयात औषधांची कमतरता नव्हती. रुग्णालयात पुरेशी औषधं होती. तिथे पुरेसे डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांची उपलब्धता आहे. यानंतरही अशा प्रकारची घटना घडल्याने ही गंभीर बाब आहे. त्यामुळे नांदेड येथे झालेल्या मृत्यूंची चौकशी होईल. यात कोणी दोषी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. राज्य सरकारने ही घटना अतिशय गांभीर्याने घेतली आहे. त्यामुळेच मंत्री, सचिव आणि अधिकाऱ्यांना रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे. आता याप्रकरणी चौकशी होईल आणि पुढील कारवाई केली जाईल.

# ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी तळमळीने काम - नितीन शेटे

लातूर/प्रतिनिधी:ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत तळमळीने काम करत असल्याचे मत अर्थभारती नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष नितीन शेटे यांनी व्यक्त केले. गांधी जयंतीचे औचित्य साधून अखिल भारतीय ग्राहक पंचायतला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने २०२३ - २४ हे वर्ष सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाचे शेटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.समारंभाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रांताचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे माजी सदस्य संपतराव झळके तर प्रमुख वक्ते म्हणून ग्राहक तक्रार निवारण मंच,पुणेचे अध्यक्ष अजय भोसरीकर यांच्यासह व्यासपीठावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील आणि सुवर्ण महोत्सवी वर्षाचे जिल्हा संयोजक अँड.संगमेश्वर रासुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा गांधी आणि युगपुरुष स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. कार्यक्रमाची सुरुवात उषा वाघमारे यांनी ग्राहक गीत गाऊन केली.जिल्हा उपाध्यक्ष बळवंतराव कागले यांचा सत्कार झळके यांनी तर सुरेखा स्वामी यांचा सत्कार भोसरीकर यांनी केला. दीपक पाटील,संजय पाटील आणि सतीश जाधव यांचा सत्कार मान्यवरांनी केला.उषा वाघमारे यांचा सत्कार अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या महिला जिल्हाध्यक्षा मंजुश्री ढेपे यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माधव गुंडरे व प्रास्ताविक दत्तात्रय पाटील यांनी केले. संपूर्ण देशात सुवर्ण जयंती महोत्सवास शुभारंभ होत आहे.ग्राहक पंचायत,नवीन ग्राहक संरक्षण कायदा व ग्राहक जागृती हे तीन विषय घेऊन कार्यक्रमाचे वाडी,वस्ती,गाव व तालुका या ठिकाणी सादरीकरण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटक नितीन शेटे यांनी जिल्हाभरातून उपस्थित अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.सुवर्ण जयंती महोत्सवासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.ग्राहक मंचचे अध्यक्ष भोसरीकर यांनी ग्राहकांचे हक्क आणि कर्तव्य,ग्राहक चळवळ,ग्राहकांना न्याय देण्यासाठी तीन स्तरीय प्रणाली,जिल्हा ग्राहक आयोग,राज्य ग्राहक आयोग आणि राष्ट्रीय ग्राहक आयोग याबाबत मार्गदर्शन केले.नवीन ग्राहक संरक्षण कायद्याची व्याप्ती उदाहरणे देऊन विषद केली आणि ग्राहक कार्यकर्त्यांनी कशाप्रकारे काम केले पाहिजे याची माहिती दिली. सुवर्ण महोत्सवी वर्षाचे जिल्हा संयोजक संगमेश्वर रासुरे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि ग्राहक जागृती याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात झळके यांनी ईश्वराने तुम्हा सर्व कार्यकर्त्यांना ग्राहक हिताचे काम करण्यासाठी संधी दिली आहे ती निष्ठेने पार पाडावी.अडचण आल्यास प्रांत कार्यकारिणी सदैव पाठीशी आहे असे मत व्यक्त केले.वर्षभराच्या कार्यक्रमाची आखणी करून सुवर्ण जयंती महोत्सवी वर्ष यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. या कार्यक्रमास तालुकास्तरीय अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करयासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत लातूर तालुका कार्यकारिणीचे धनराज जाधव,तालुका अध्यक्ष इस्माईल शेख,जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाटील,महिला कार्यकारिणीच्या जिल्हाध्यक्षा मंजुश्री ढेपे,जिल्हा संघटक सौ. सारिका मसळकर , जिल्हा कार्यकारिणीचे किशन वडारे,दिलीप पाटील,बळवंत कागले रेणापूर तालुका अध्यक्ष महादेव बांडे,शहराध्यक्ष नंदकुमार वलमपल्ले, महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा अश्विनी बने,

चाकुर तालुकाध्यक्षा शकुंतला शेवाळे,लातूर महिला कार्यकारिणी अध्यक्षा उषा वाघमारे , शिरूर अनंतपाळ महिला कार्यकारिणी अध्यक्षा संगीता काथवटे,जिल्हा संयोजक अँड.रासुरे व सौ.रासुरे यांनी परिश्रम घेतले.उपस्थितांचे आभार माधव गुंडरे यांनी मानले.

# नांदेड विद्यापीठाअंतर्गत येणार्या शिवाजी महाविद्यालयाचे उत्कृष्ठ कार्य आहे - कुलगुरू डॉ. उध्दवराव भोसले

लातूर दि.०३-१०-२०२३ जे.एस.पी.एम. संस्थेअंतर्गत व नांदेड विद्यापीठाअंतर्गत येणार्या रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालयाने ग्रामीण महाविद्यालयातून नॅक बी+ दर्जा सीजीपीए २.७५ घेऊन सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून मान मिळविलेला आहे. याबरोबरच या महाविद्यालयाला आदर्श प्राचार्य, आदर्श प्राध्यापक पुरस्कारही मिळालेले आहेत. अत्यंत कमी कालावधीमध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये शिवाजी महाविद्यालयाने चौफेर भरारी घेण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे संस्थेने शिवाजी महाविद्यालयाला केलेल्या सहकार्याची पावती म्हणून येणार्या काळातही शिवाजी महाविद्यालयाने राज्यात सर्वोत्कृष्ठ भरारी घेण्याचे काम करावे यासाठी नांदेड विद्यापीठाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे काम आपण करू असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ.उध्दवराव भोसले यांनी केले.यावेळी ते जेएसपीएम संचलित शिवाजी महाविद्यालयामध्ये आयोजित भूकंप मापन केंद्र व डॉ.सी.डी.देशमुख स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी केंद्राचे उद्घाटन आणि गुणवंताच्या सत्कार समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा किसान मोर्चा गोवा प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संचालक राजेश शिंदे, जेएसपीएम संस्थेचे शैक्षणिक संचालक संभाजीराव पाटील, आप्पासाहेब पाटील, दिलीप पाटील, प्राचार्य आर.एस.अवस्थी, जननायक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, शिवाजी महविद्यालयाचे समन्वयक प्राचार्य मारूती सूर्यवंशी, विजयकुमार एकूर्गे, हकीम, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही.घाडगे, उपप्राचार्य डॉ.पी.आर.शिंदे, उपप्राचार्य डॉ. जी.आर.नागरगोजे, उपप्राचार्य प्रा.एम.बी. जाधव,प्राचार्य बोंडगे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना कुलगुरू भोसले म्हणाले की, १९९३ मध्ये किल्लारीला भूकंप झाला आणि लातूरची घटना देशभरात गेली. या घटनेमध्ये हजारो लोक मृत्यूमुखी पडले. त्यामुळे अशा नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमातून ७ भूकंप मापन केंद्र उभारण्यात आलेले आहेत. या केंद्रामध्ये २ महाविद्यालयाचा समावेश असून तिसरे केंद्र म्हणून शिवाजी महाविद्यालय रेणापूर या केंद्राची भर पडलेली आहे. परंतु यामध्ये होणार्या संशोधनामुळे यापुढील काळात आपत्तीच्या एक तास अगोदर या घटनेची माहिती आपल्यासमोर येणार असल्याचे संशोधन सुरू आहे. त्यामुळे अशा घटनेमुळे होणारी हाणी भविष्यात टाळता येणार असल्याचे मतही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन





करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर.एस.अवस्थी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.क्रांती मोरे व प्रा.शेरखाने यानी केले तर आभार प्रा.पी.टी.पवार यांनी मानले. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भविष्यात भारत आर्थिक प्रगतीमध्ये तिसर्या क्रमांकावर येईल - माजी आ.कव्हेकर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली सरकारमुळे देशाची चौफेर प्रगती होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE